महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०३ वे | दिनांक : ०७/०४/२०२६ | वार : मंगळवार

## बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देण्याचा काँग्रेसला अधिकार



**मुंबई :** "काँग्रेस हा एक मोठा आणि स्वतंत्र राजकीय पक्ष आहे. निवडणूक लढवण्याबाबत निर्णय घेणे हा त्यांचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक निवडणुकीत कुणीतरी विरोधात लढणारच, हे गृहीत धरूनच रिंगणात उतरावे लागते. त्यामुळे बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध न होण्याबाबत अधिक चर्चा करण्याची गरज नाही," असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले आहे.

शरद पवार यांनी आज राज्यसभेच्या खासदारीकीची शपथ घेतली. यानंतर दिल्लीत ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी बारामती पोटनिवडणूक, अशोक खरात प्रकरण, पार्थ पवार यांसह विविध मुद्द्यावर भाष्य केले.

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेबाबत बोलताना शरद पवार भावूक झाले. ते म्हणाले, "अजितदादांच्या जाण्याने आमच्या संपूर्ण कुटुंबाला मोठे दु:ख झाले आहे. ते लोकांसाठी अत्यंत सक्रिय होते आणि विकासकामांत त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्याबद्दल मनात आदर आहे, हे मान्यच करावे लागेल. सध्या पवार कुटुंबात 'कुटुंबप्रमुख' म्हणून माझ्यावर जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही बारामतीची ही पोटनिवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आम्ही या निवडणुकीत कोणाचाही प्रचार करणार नाही."

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज बारामती विधानसभा पोटनिवणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी आयोजित केलेल्या सभेत पक्षाच्या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह शरद पवार यांचाही फोटो होता. याबाबत शरद पवार यांना विचारले असता, त्यांच्या पक्षाच्या बॅनरवर एनडीएच्या नेत्यांचे फोटो असण्यात काही अडचण नाही. कारण ते एनडीएमध्ये आहेत. पण राष्ट्रवादीच्या बॅनरवर माझा फोटो वापरणे चुकीचे आहे.


दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चेवरही शरद पवार यांनी पडदा टाकला. "विलीनीकरणाची चर्चा ही जयंत पाटील आणि अजित पवार यांच्यामध्ये सुरू होती. मात्र, सध्या आमच्या पक्षात विलिनीकरणाबाबत कोणतीही चर्चा सुरू नाही. अजितदादांसोबत या संदर्भात पाच-सहा बैठका झाल्या. बैठक झाल्यावर दोघांपैकी एक येऊन मला ब्रिफिंग करायचे. भविष्यात ही प्रक्रिया पुढे होऊ शकते की नाही आज ते सांगता येत नाही. अजित पवारांचा दृष्टिकोण आणि आग्रह हा आमच्या लोकांना समाधान देणारा होता. ते गेल्यामुळे ते कंटिन्यू राहिलं नाही. त्यामुळे आता पक्षाचं काम करत राहावं अशीच भूमिका आहे." असे ते म्हणाले.

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीत काँग्रेसने उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. यावर भाष्य करताना पवार म्हणाले की, "महाविकास आघाडीतील घटकपक्ष म्हणून काँग्रेसला माघार घेण्याबाबत सांगण्याची आम्हाला गरज वाटत नाही. राजकारणात पराभव झाला तरी लोक लोकांची कामे करण्यासाठीच मैदानात उतरत असतात. राहुरीतून प्राजक्त तनपुरे यांनी माघार घेतली की नाही, याची मला अद्याप माहिती नाही."

बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देण्यावरून राष्ट्रवादीचे खासदार पार्थ पवार यांनी काँग्रेसवर टीका केली होती. याबाबत शरद पवारांना विचारले असता, "राजकारणामध्ये अशा प्रकारचे वक्तव्य करण्यासाठी परिपक्वता लागले. राजकारणातील परिपक्वता पार्थ पवार यांच्याकडे आहे की नाही याची माहिती नाही," अशी प्रतिक्रिया दिली.

तसेच, राज्यात गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणावर बोलताना, शरद पवार म्हणाले, "आज राज्यात चिंता वाटावी अशी परिस्थिती आहे. एका बाजूला शाहू, फुले, आंबेडकर म्हणायचं आणि दुसरीकडे अशा पद्धतीने लोकप्रतिनिधी जातात हे चिंताजनक आहेत. कोणी किती फोन केले हे माझ्या वाचनात आलं, त्यात अनेकांची नावं आहेत. त्यात राजकीय पक्षात स्थान भुषवणारे लोक आहेत."

## अखेर भोंदू अशोक खरातवर मनी लॉँड्रिंगचा गुन्हा दाखल



**नाशिक :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी भोंदू अशोक खरात विरोधात आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी मनी लॉँड्रिंगचा गुन्हा दाखल केला. यामुळे खरातवर दाखल असणाऱ्या गुन्ह्यांची संख्या १३ वर पोहोचली आहे. या गुन्ह्यामुळे भोंदू खरातचा पाय आणखी खोलात गेला आहे.

भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी त्याच्याविरोधात आतापर्यंत १२ गुन्हे दाखल झालेत. यापैकी ८ गुन्हे हे महिलांचे लैंगिक शोषण, फसवणूक व जादूटोणा केल्याशी संबंधित आहेत. तर इतर ४ गुन्हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. त्यात आता ईडीने दाखल केलेल्या मनी लॉँड्रिंगच्या गुन्ह्याची भर पडली आहे. ईडीने प्रस्तुत प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहाराप्रकरणी नाशिक पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर हा गुन्हा (ECIR) दाखल केला आहे. त्यानुसार, पोलिसांनी जमा केलेली सर्व महत्त्वाचे दस्तऐवज ईडीने आपल्या ताब्यात घेतले आहेत. अशोक खरातचे आर्थिक साम्राज्य नेमके कसे उभे राहिले? याचा तपास आता ईडी करत आहे.

ईडीने गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणाचा प्राथमिक तपास सुरू केल्याचीही माहिती आहे. या प्रकरणी अशोक खरातच्या बेहिशोबी मालमत्तांसह त्याच्या बँक खात्यांची माहिती घेतली जात आहे. या तपासानंतर खरातच्या मालमत्तांवर टाच येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अशोक खरात व त्याची पत्नी कल्पना खरात यांच्यासह ५ जणांविरोधात शिर्डीत बेकायदा सावकारकी व जमीन व्यवहारात गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे अशोक खरातच्या आर्थिक व्यवहारासह मालमत्ता खरेदी - विक्रीचे व्यवहारही तपास यंत्रणांच्या रडारवर आल्या आहेत. या प्रकरणी विशेष तपास पथकाने शिर्डी नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व माजी नगरसेवकांना चौकशीसाठी समन्स बजावला आहे. साई संस्थानचा एक माजी विश्वस्तही यासंबंधी चौकशीच्या रडारवर आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, शिर्डीत भोंदू खरातचा मोठा भक्त परिवार होता. त्यामुळे त्याचे सर्वाधिक आर्थिक व्यवहार व मालमत्ता खरेदी - विक्रीचे व्यवहार तेथूनच चालायचे. तो आपल्या अनेक भक्तांच्या मालमत्ता खरेदी - विक्रीत भागीदार असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी नाशिकच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी अशोक खरात प्रकरणाची ईडी मार्फत चौकशी करण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी ईडीने या प्रकरणात गुन्हा दाखल केला आहे. मुख्यमंत्री यासंबंधी म्हणाले होते, अशोक खरात प्रकरणात एसआयटी सखोल चौकशी करत आहे. हा तपास रोजच्या रोज जाहीर करता येणार नाही. पण खरातची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. त्याच्या सर्व व्यवहारांची चौकशी होईल. ईडीनेही या प्रकरणाची माहिती घेतली आहे. त्यामुळे त्याची ईडी चौकशीही होईल.

## नांदेड गँगवॉरने पुन्हा हादरले : सत्ताधारी शिवसेनेच्या युवा सेना शहराध्यक्षाची भररस्त्यात हत्या



**नांदेड :** शहर सोमवारी आणखी एका हत्येने हादरले. आज पहाटे ५.३० च्या सुमारास मॉर्निंग वॉगसाठी गेलेल्या सत्ताधारी शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याची हल्लेखोरांनी भररस्त्यात तलवारीने सपासप वार करून निर्घृण हत्या केली. गत ३ दिवसांतील शहरातील हत्येची ही पाचवी घटना आहे. त्यामुळे नांदेड पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमेतवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, सोनू कल्याणकर (३५) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो सत्ताधारी शिवसेनेच्या युवा सेनेचा शहराध्यक्ष होता. सोनू कल्याणकर सोमवारी पहाटे ५.३० च्या सुमारास नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकसाठी गेले होते. त्यांच्यासोबत त्यांचा पाळीवर कुत्राही होता. यावेळी शहरातील श्रीनगर भागातील पंचशील कापड दुकानालगतच्या कुमार ड्रेसेस सोमर एका चारचाकीतून आलेल्या ६-७ हल्लेखोरांनी त्यांच्यावर लोखंडी रॉड, चाकू व तलवारींच्या सहाय्याने जीवघेणा हल्ला चढवला. हल्लेखोरांनी कल्याणकर यांची मान, पाठ व शरीराच्या विविध भागांवर वार करत त्यांना रक्तबंबाळ केले.

या हल्ल्याची तीव्रता एवढी होती की, सोनू कल्याणकर जागीच कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी ते गतप्राण झाल्याचे पाहताच आपल्या वाहनातून पोबारा केला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करत तपासासाठी विशेष पथके तयार केली. या प्रकरणी एका संशयिताला तत्काळ ताब्यात घेण्यात आल्याची माहिती मिळत आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे सोनू कल्याणकर यांच्यावर यापूर्वीही एकदा गोळीबार झाला होता. पण त्यात ते बचावले होते. पण यावेळी हल्लेखोरांनी त्यांचा थेट जीव घेतला.

दुसरीकडे, पोलिसांनी सोनू कल्याणकर यांच्या हत्येनंतर तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. त्यात एक संशयित शहरालगतच्या झरी गावालगत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यांनी तत्काळ तिकडे धाव घेतली असता संशयित पळून जात असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी पोलिसांनी त्याचा पाठलाग करत त्याच्या पायावर गोळी झाडली. त्यात तो जखमी झाला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. सध्या त्याला शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर झरी परिसरातही काहीवेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेत आहेत.

दुसरीकडे, नांदेड शहरातील ३ दिवसांतील आजची पाचवी घटना आहे. २ दिवसांपूर्वी भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत तिहेरी हत्याकांड घडले होते. त्यात वर्चस्वाच्या वादातून सदा गंग व साई लाला गँगच्या पंटर्समध्ये राडा झाला होता. त्यात अरिजितसिंह चव्हाण, मोहम्मद अरबाज व सय्यद आवेज यांचा खून झाला होता. त्यानंतर वजिराबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुरमुरा गल्लीत रज्जुसिंग तबेलेवाले यांची हत्या झाली होती. त्यानंतर आज पहाटे सोनू कल्याणकर यांची हत्या झाली.

सातत्याने घडणाऱ्या या खुनांच्या घटनांमुळे शहरातील गुन्हेगारी टोळ्यांचे धाडस वाढल्याचे चित्र आहे. मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे व अगदी रुग्णालय परिसरातही हल्ले होत आहेत. त्यामुळे गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरला नसल्याची भावना नागरिकांत निर्माण झाली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ एप्रिल २०२६


## राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचा संघ जाहीर



**छत्रपती संभाजीनगर :** नागपूर येथे होणाऱ्या वरिष्ठ व्हॉलीबॉल पुरुष व महिला संघ जाहीर करण्यात आला विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या निवड चाचणी हा संघ जाहीर करण्यात आला ही स्पर्धा नागपूर येथे नऊ ते बारा एप्रिल दरम्यान होणार आहे पुरुष गटाचा संघ सुहास हिरवे तन्मय बा रे कर शेख आयान पवन काळे सय्यद उमे र शेख रहेमान मोहम्मद उमर शेख शेख रहे मान सय्यद फैजान पठाण दनि स व ं श बावरे विनायक तळेकर प्रदुग्न वावरे प्रण व पवार तन्मय मौर्य प्रशिक्षक म्हणून जब्बार पठाण टिंब मॅनेजर म्हणून सोमनाथ पचलुरे या संघाला जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे कार्याध्यक्ष उन्मेष शिंदे संघटनेचे सचिव सतीश पाठक व सदस्य प्रवीण शिंदे शेख युनूस डॉ गोविंद कदम विद्यापीठ व्हॉलीबॉल प्रशिक्षक अभिजीत दिक्कत आसिफ पठाण नारायण शिंदे प्रफुल कुलकर्णी विशाल मनगटे आदी उपस्थित होते आणि यांनी सांगायला शुभेच्छा दिल्या.

## मुक्तानंद गोस्वामी यांना आदर्श क्रिडा शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**कन्नड (अरुण थोरात) :** हैप्पी टु हेल्प फॉउंडेशन च्या वतीने मौलाना अबुल कलाम आझाद मॉडेटेरीयन हॉल औरंगाबाद येथे आयोजित कार्यक्रमात राज्यस्तरीय आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले असून, कन्नड तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी (मुख्याध्यापक) बाबूराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय कळंकी, एजाज शहा अली अलाना उर्दू माध्यमिक विद्यालय कुन्जखेडा यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून आ. विक्रम काळे(मराठवाडा शिक्षक आमदार), प्रमुख पाहुणे म्हणून हसन अख्तर (महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी अध्यक्ष) तसेच हैप्पी टु हेल्प फॉउंडेशन चे संस्थापक शेख अब्दुल रहीम उपस्थित होते. याबद्दल कन्नड पंचायत समिती शिक्षण विभाग कार्यलयीन अधिक्षक अशोक जाधव, प्रवीण शिंदे, बाळू जहागीरदार यांनी पुरस्कार्थींचे अभिनंदन केले आहे.

## उन्हाळ्याच्या सुट्टीत

उन्हाळ्याच्या सुट्टीत<br>
सहलीला जावूया<br>
किल्ले नि टेकडया<br>
जवळून पाहूया

उन्हाळ्याच्या सुट्टीत<br>
आईस्क्रीमची गाडी<br>
मिठासोबत खायच्या<br>
कैरीच्या फोडी

उन्हाळ्याच्या सुट्टीत<br>
खूप खूप खेळायचे<br>
सायंकाळच्या वेळी<br>
मनसोक्त पोहायचे

उन्हाळ्याच्या सुट्टीत<br>
नको अभ्यासाचे नाव<br>
सुप्त कला गुणांना<br>
द्यायचा आता वाव

उन्हाळ्याच्या सुट्टीत<br>
मजाच मजा<br>
दोन महीने नसतो<br>
अभ्यासाचा बोजा



**- रवींद्र व्ही. चालीकवार**<br>
मु.पो.ता.महागाव<br>
जि.यवतमाळ<br>
मो.9011559106

## डॉ. भाऊसाहेब कुऱ्हाडे व डॉ. प्रज्ञा कुऱ्हाडे यांच्या १४ ग्रंथांचे प्रकाशन उत्साहात




**छत्रपती संभाजीनगर :**, लंका प्रकाशन,(छत्रपती संभाजीनगर) यांच्या वतीने पाली भाषेचे अभ्यासक, बुद्धलेणींचे संशोधक व संपादक डॉ. भाऊसाहेब कुऱ्हाडे आणि त्यांची कन्या प्रा. डॉ. प्रज्ञा कुऱ्हाडे यांच्या चौदा ग्रंथांचा प्रकाशन समारंभ उत्साहात संपन्न झाला.*"हॉटेल द्वारका ग्रँड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य प्रा. डॉ. हिंमतराव जाधव हे तर प्रमुख अतिथी म्हणून पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार भगत यांच्यासह प्रभाकर जोगदंड, आनंद खरात, प्रा.डॉ. भंते चंद्रबोधी आणि साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते*.*या समारंभात डॉ. भाऊसाहेब कुऱ्हाडे यांनी लिहिलेल्या पाली अँड बुद्धिझम या विषयावरील ९ ग्रंथांचे प्रकाशन झाले, तर प्रा. डॉ. प्रज्ञा कुऱ्हाडे यांच्या ५ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ.कुऱ्हाडे यांनी ऐतिहासिक लेण्यांचा इतिहास, त्यांचे संरक्षण व महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. प्रज्ञा कुऱ्हाडे यांनी वडिलांच्या प्रेरणेतून लेखनकार्य सुरू करून ५ ग्रंथ प्रकाशित केल्याचे सांगितले. या प्रसंगी डॉ. शिवकुमार भगत, प्रा. डॉ. हिम्मतराव जाधव, प्रभाकर जोगदंड आणि आनंद खरात यांनी मनोगत व्यक्त करत कुऱ्हाडे परिवाराच्या वैचारिक योगदानाचे कौतुक केले. तसेच प्रा. नलिनी कुऱ्हाडे यांनी दिलेल्या अनमोल योगदानाबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात डॉ. गजाला शेख,प्रा.सुनीता गवळी, डॉ.विद्या जाधव, प्रा.वंदना वाघमारे, यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला तसेच प्रा.प्रेमदास राठोड,प्रा.प्रिया निरगुडे, प्रा. दिपाली काठोळे यांनी मान्यवरांचे स्वागत करून दिले दिले.

सूत्रसंचालन श्री. कृष्णा वाघ यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सुनील शिंपी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. हर्षवर्धन इंगळे, ॲडवोकेट अभिजीत कुऱ्हाडे यांनी परिश्रम घेतले. कला व साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने कुऱ्हाडे परिवाराच्या साहित्यिक कार्याला नवी दाद मिळाली.

या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर सह मराठवाड्यातील असंख्य साहित्यिक, कौटुंबिक तथा माजी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






## माणुसकी

माणसाने माणुसकी<br>
आता जिवंत ठेवावे<br>
जगाकडे पाहतांना<br>
आधी स्वत:स पहावे..१

जगतांना कायमच<br>
प्रेम वाटत जगावे<br>
दु:ख मनी पचवूनी<br>
क्षमा सर्वांना करावे...२

माणसात माणुसकी<br>
सदा शिल्लक असावी<br>
माणसाने माणसास<br>
आता प्रेमाने जपावी..३

नाते जपतांना जगी<br>
सेवा निस्वार्थ करावी<br>
आयुष्यात जगतांना<br>
प्रेम सतत भरावी....४

प्रेमरंग भरतांना<br>
सप्तरंग उधळावे<br>
दु:खी माणसास मात्र<br>
सदोदित हसवावे...५

**नागेश बोंतेवाड,**<br>
**छत्रपती संभाजीनगर**<br>
**९७६३२८३७०४**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ एप्रिल २०२६


## कलमुगळीच्या सार्वजनिक भीमजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी तर उपाध्यक्ष पदी लक्ष्मण सूर्यवंशी





**निलंगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील कलमुगळी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३० व्या सार्वजनिक जयंतीच्या निमित्ताने कलमुगळी येथे सर्व गावकऱ्यांची बैठक घेण्यात आली. मौजे कलमुगळी येथे दरवर्षीप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 130 व्या जयंतीनिमित्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला समाजातील बौद्ध उपासक आणि उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.सालाबादप्रमाणे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कलमुगळी गावात मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते.महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांचे व्याख्यान, लेझीम संघ,गायन पार्टी व भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात येते.त्यासाठी दरवर्षी गावातील नागरिकांची बैठक बोलावून नूतन कार्यकारिणीची निवड केली जाते.त्याचाच भाग म्हणून काल बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या आयोजित केलेल्या बैठकीमध्ये पत्रकार धोंडीबा सूर्यवंशी यांनी जयंती उत्सव समितीच्या यावर्षीच्या अध्यक्षपदासाठी प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला आणि त्याला सर्व उपस्थित जनसमुदायाने एकमताने अनुमोदन दिले, त्याचबरोबर श्री तात्याराव शिंगारे यांनी उपाध्यक्ष पदासाठी श्री लक्ष्मण सूर्यवंशी यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला त्यालाही सर्व बौद्ध उपासकांनी एकमताने मान्यता दिली व जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी निश्चित करण्यात आली .या बैठकीमध्ये दरवर्षीप्रमाणे मागील वर्षाचा आर्थिक लेखाजोगा यांचा आढावा घेण्यात आला व विविध कार्यक्रमांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. या बैठकीला सम्यक जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य श्री. नागोराव सूर्यवंशी , श्री अंगद सूर्यवंशी, श्री अंकुश सूर्यवंशी, श्री. बाबू गायकवाड, श्री. श्रीपती सूर्यवंशी, श्री. पांडु सूर्यवंशी, तसेच भारतीय बौद्ध महासभा महिला मंडळाच्या पदाधिकारी सौ. रुक्मिणी सूर्यवंशी, सौ. छाया सूर्यवंशी, सौ. लोचना सूर्यवंशी, सौ. मंजुळा सपाळ, सौ. नरसा सूर्यवंशी, सौ. अनुसया सूर्यवंशी, सौ. चित्रा गोपाळे यांच्यासह गावातील असंख्य नागरिक उपस्थित होते. शेवटी सामाजिक कार्यकर्ते किशोर सूर्यवंशी, दिगंबर सूर्यवंशी, धोंडीबा सूर्यवंशी , दिलीप सूर्यवंशी, सिद्धार्थ सूर्यवंशी, मारुती सूर्यवंशी आणि प्रशांत गायकवाड यांनी आपापली मनोगते व्यक्त केली आणि यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अनोख्या उपक्रमाने साजरी करण्याचे ठरविण्यात आले आणि बैठकीची सांगता झाली.

## भाजप कार्यकर्त्यांनी विचारधारेशी कुठलीही तडजोड करु नये



**कन्नड (अरुण थोरात) :** राष्ट्रवाद ही आपली विचारधारा घेऊण आपण वाटचाल करीत आहोत. त्यामुळे विचारधारे च्या बाबतीत कोणती ही तडजोड करु नये. असे अवाहन भाजप छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी केले आहे.ते दि. 05 एप्रिल रोजी 'पंडित दिनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान 2026' अंतर्गत चापानेर ता.कन्नड येथे भाजप पश्चिम मंडळ प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी बोलत आहे.या उपक्रमांतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आपल्या विचारधारेवर वाटचाल करीत असताना कार्यकर्त्यांनी स्वताला कमी लेखू नये, दिल्ली पासून ते गल्ली पर्यंत आपली सत्ता आहे. त्यामुळे विकास योजना तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी आपल्याला कोणा पीढे ही हातपाय पसरविण्याची आवश्यकता नाही. जिल्हा परिषद निवडणूकीत ही आपण वरचढ ठरले आहोत. जनता आपल्या पाठीशी उभी आहे. त्यामुळे निर्वाचीत लोकप्रतिनिधीं नी कोणती ही अपेक्षा न ठेवता जनाता, शेतकर्यांची कामे करावीत, केवळ खुर्चीत न बसता सतत जनतेत फिरून त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात, विरोधकांच्या बाबतीत लेचेपेचे धोरण ठेवू नये. त्यांना कणखर आणि कठोरपणे प्रतिउत्तर दयावे. भाजप आता हा आधुनिक काळातील पक्ष आहे. त्यामुळे जिल्हापरिषदेत 2017 मध्ये सत्ते पासून दूर ठेवण्याचा प्रयत्न झाला. त्याची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न यावेळी हाणून पाडत आपण सत्ता काबिज करित विरोधकांचा डाव उधळून लावला. आपल्याला पार्टी बद्दल आत्मसन्मान हवा. जि.परिषदेत पाच वर्षे आपली सत्ता असणार आहे. आणि ही फक्त सुरुवात आहे. त्यामुळे निर्भीड पणे काम करावे असे अवाहन ही त्यांनी यावेळी केले. यावेळी व्यासपीठावर भाजप राज्य कार्यकारणी सदस्य तथा जिल्हापरिषद सदस्य डॉ. संजय गव्हाणे, किशोर आबा पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, रामा मुळे, विलास कापसे, प्रशांत आग्रवाल, सौरभ कुलकर्णी, अर्चना ताई पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध सत्रांत कार्यकर्त्यांना केंद्र, राज्य सरकारच्या कल्याणकारी योजना, कार्यकर्त्यांची जबाबदारी, संघटनवृ्धदी, जनसंपर्क, बुथ ते मंडल रचना व कार्य आदीं बाबत प्रशिक्षण देण्यात आले. याप्रसंगी मंडल अध्यक्ष ललीत सुरासे, मा.पंस.उपसभापती सुनिल निकम, महेश मलदुडे, कैलास जाधव, भावेश शिंदे, सरपंच दादासाहेब शिंदे, अरुण थोरात, दिनकर दाभाडे, रतन मधे, सुदाम पवार, गणेश चव्हाण, शशिकांत नागरे, आदींसह बुथ, शक्ती केंद्र प्रमुख, पदाधिकारी उपस्थित होते.



ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## खास लोकाग्रहास्तव माईसाहेब आंबेडकर चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला




**भीम**जयंती निमित्त बाबासाहेबांच्या जीवनाच्या उत्तरार्धातील महत्त्वाच्या प्रसंगांवर आणि त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा माईसाहेब डॉक्टर सविता भीमराव आंबेडकर हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या सेवेत रुजू होत आहे.हा चित्रपट माईसाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित असला तरीही माईसाहेबांचे जीवन हे बाबासाहेबांपासून वेगळं करता येत नाही माईसाहेब बाबासाहेबांच्या जीवनात आल्यानंतर राज्यघटना, हिंदू कोड बिल आणि धर्मांतर या महत्त्वाच्या जागतिक पातळीवर परिणाम करणाऱ्या घटना माईसाहेबांच्या उपस्थितीत घडल्या. यादरम्यान बाबासाहेबांची प्रकृती ठीक नव्हती त्यांच्या आरोग्याची काळजी औषधपाणी,पथ्यपाणी यांची जबाबदारी माईसाहेबांनी यशस्वीरित्या पार पाडली आणि बाबासाहेबांना या कार्यात प्रकृतीमुळे कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घेतली. याच प्रसंगावर आधारित हा चित्रपट आहे. या चित्रपटात शैलेश दातार, पल्लवी पालकर, शंतनू मोघे, कमलेश सावंत डॉ. विजयकुमार देशमुख, माधव अभ्यंकर, अनिल नगरकर, सीमा पाटील यांच्यासह अनेक कलावंतांनी काम केले आहे. या चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक प्रकाश त्रिभुवन आहेत. या चित्रपटाला वर्ल्ड फिल्म फेस्टिवल कांस, इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल हैदराबाद तसेच अंबरनाथ फिल्म फेस्टिवल असे अनेक राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. तसेच या चित्रपटाला प्रेक्षकांची ही पसंती आणि दाद मिळालेली आहे म्हणून प्रेक्षकांच्या आग्रहास्तव आणि भीमजयंती चे औचित्य साधून हा चित्रपट पुन्हा १०एप्रिल २०२६ पासून चित्रपटगृहात प्रसिद्ध होत आहे .भीमप्रेमी चित्रपट रसिकांनी या चित्रपटाला प्रतिसाद द्यावा अशी विनंती निर्मात्याकडून करण्यात येत आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ एप्रिल २०२६


# सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया

दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात ‘जागतिक आरोग्य दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे ‘आरोग्य’ हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफूड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे.आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते.आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. ‘सर्वांसाठी आरोग्य’ ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो.शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पैसा, प्रतिष्ठा, यश या सर्व गोष्टी आरोग्याच्या पुढे गौण आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी आणि समाजातही आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करावी. ‘सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र’ ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**

**bagate.rajendra5@gmail.com**


# राहुरी विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून बंडखोरी



**अहिल्यानगर :** महाराष्ट्रात दोन मतदारसंघात पोटनिवडणुका होणार असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर बारामती विधानसभा मतदारसंघातून दिवंगत नेते व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. तर राहुरी मतदारसंघात भाजपचे अक्षय कर्डिले यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बारामती प्रमाणेच राहुरीतही बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी महायुतीकडून प्रयत्न सुरू होते. मात्र राहुरीत शिवसेना शिंदे गटाकडूनच बंडखोरी झाल्याचे समोर आले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत आता राजकीय ट्विस्ट आला असून, शिवसेना शिंदे गटाच्या शेतकरी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी मोरे यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांना विधानसभेत प्रभावीपणे मांडण्यासाठी खुद्द शेतकऱ्यांनीच आग्रह धरल्यामुळे आपण निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याचे मोरे यांनी अर्ज भरल्यानंतर स्पष्ट केले.

यावेळी महायुतीच्या युती धर्माबाबत विचारले असता मोरे यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. राहुरी नगरपरिषद आणि स्थानिक कारखान्याच्या निवडणुकीत भाजपने शिंदे गटाला कधीही विश्वासात घेतले नाही, मग आम्ही तरी त्यांचा विचार का करावा, असा रोखठोक सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे बारामतीमध्ये महायुतीत एकवाक्यता दिसत असली तरी, राहुरीत मात्र शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यानेच बंडखोरीचे निशाण फडकावल्याने महायुतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

तर दुसरीकडे राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी शरद पवार गटाकडून प्राजक्त तनपुरे यांचे नाव आघाडीवर असताना आणि ठाकरे गटानेही या जागेवर दावा केला असताना, अचानक घडलेल्या नाट्यमय घडामोडींनी राजकीय चित्र बदलले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी सकाळी तनपुरे यांची भेट घेऊन त्यांच्याशी बंद दाराआड चर्चा केली, ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संवाद साधून दिल्याचे समजते. या मध्यस्थीनंतर प्राजक्त तनपुरे आता निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

शरद पवार गटाने दोन 'एबी' फॉर्म पाठवले असून, त्यात प्राजक्त तनपुरे आणि गोविंदराव मोकाटे यांच्या नावाचा समावेश आहे. जर काही कारणास्तव प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही, तर पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून गोविंदराव मोकाटे रिंगणात उतरतील, हे आता स्पष्ट झाले आहे. पक्षाकडून लवकरच अधिकृत उमेदवाराची घोषणा केली जाणार असून, या आक्रमक पवित्र्यामुळे राहुरीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता मावळली असून तिथे आता प्रत्यक्ष लढत होणार असल्याचे जवळपास निश्चित मानले जात आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ एप्रिल २०२६

# प्रतिष्ठान चे साक्षेपी 'संपादकीय' विनम्र विवेचन

**आ**दरणीय संपादक प्रिय सन्मित्र श्रीधर नांदेडकर सर,सविनय नमस्कार.मराठवाडा साहित्य परिषदेचे मुखपत्र"प्रतिष्ठान" चे संपुर्ण वर्षाचे अंक मिळाले.मन भाराऊन गेले.आपल्या सृजनशील साक्षेपी संपादन कार्य आणि सविनय निस्सीम वाचनीय संपादकीय.प्रतिष्ठान हे पंच्याहत्तरी पदार्पण करते आहे.श्रीधर नांदेडकर लिहितात "साहित्याचं क्षेत्र म्हणजे रणभूमी नसते,ती प्रेमभूमी असते.असं आम्हाला वाटतं.साहित्यात वाद असू शकतात, मतभेद असू शकतात परंतु साहित्य हे स्पर्धा करण्याचं क्षेत्र नाही.याबाबत सर्वांचं एकमत व्हावं, असं आम्हाला वाटतं.साहित्य जीवन संघर्षाचं ओझं आणि ताण हलकं करण्याची क्षमता बाळगतं.साहित्य एकाकीपणाच्या दुखण्यावर रामबाण औषध असतं.कोलमडून पडणाऱ्या माणसाचं बोट धरुन त्याला पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याची जादू साहित्यात असते.याची जाणीव ठेवून 'प्रतिष्ठान' लेखक,कवी, कलावंत,तंत्रज्ञ या सर्वांना घेऊन 'ऐकोप्याचं' स्वप्न साकार करू पाहतं. दोन चांगल्या कलाकृतींमध्ये स्पर्धाही नसते आणि तुलनाही नसते.प्रत्येक चांगली कलाकृती आपलं स्वतंत्र प्रभाव क्षेत्र निर्माण करते.परंतू आपण एका समग्र साहित्य विश्वाचा अंश अहोत याची चांगल्या कवी लेखकाला हमखास जाणीव असते.त्यामुळे'प्रतिष्ठान' कुणाशी स्पर्धा करण्याचा विचारसुद्धा करतं नाही.समग्र साहित्य विश्वात आपण एक छोटीशी परंतु सकारात्मक भूमिका निभावणार अहोत याची आम्हाला व आमच्या सहकार्यांना नम्र जाणीव आहे."इति श्रीधर नांदेडकर.हे संपादकीय विनम्र विचारांची बांधिलकी अतिशय नितळ निर्लेप भावनेचा ओलावा कायमचं ठेवणारी बाब आहे.कारण आमच्या गुरूजनाचा वसा आणि वारसा हा विवेकी विचाराधारेचा आहे.प्रतिष्ठान अतिशय उत्तम केल्याने 'प्रतिष्ठान येता घरा, मन वेल्हाळ पाखरा'.. प्रतिष्ठान चे कुरिअर सेवा इतकी तत्पर झाली की,अंक पाठवला आणि प्रोफेशनल कुरिअर देशपांडेनी लागलीच फोनं केला.सर, कुठे आहे?तुमचे संभाजीनगर येथून तीन प्रतिष्ठानाचे अंक आले.मी घरी घेऊन येतो.प्रतिष्ठान म्हणताचं मनाच्या डोळ्यात श्रीधर नांदेडकर सर तरळून गेले.अंक मिळाला.माझा पत्ता अतिशय सुंदर टाईप केलेला.चिकटपट्टीने अतिशय उत्तम पद्धतीने बांधलेला.कुणीही इतक्या सहजतेने उघडूच शकतं नाही.मी हळूवार स्पर्शून अंक जवळ घेतो.छोटी कात्री घेऊन अलगद कापतो.अंकाच्या कव्हरला दुखापत होऊ देतं नाही.मग चिकित्सक चिकटपट्टी मुखपृष्ठ कव्हर सांभाळीत काढतो.माझे नावं पत्ता दर्शनी त्याचे ही कात्रण करतो.कागद कचरा गोळा करतो.बायको तिरकस नजरेने हे सारं निहाळते.मी कचरा डजबीन मध्ये टाकतो.तिला बरे वाटते.मी प्रतिष्ठानचा अंक हळूने पानं चाळतो.संपादकीय मन लावून वाचतो.'प्रतिष्ठान सतत आपल्या भाषेतल्या भूमी आणि प्रदेशातल्या, आपल्या परिसरातल्या गंभीरपणे आणि व्रतस्थपणे लिहू पाहणाऱ्या लेखकाच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे.हीच पंरपरा आम्हाला पुढे न्यायची आहे'.आमेन.श्रीधर नांदेडकर हा "सुफी प्रार्थनांच्या किनाऱ्यावरुन" किती मायाळू स्नेहाळू प्रतिष्ठानाचा वाड्मयीन मूल्याधिष्ठित अंक देतो.संपादकीय लिहितो ते असे की,"स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या संपन्न सांस्कृतिक जीवनाच्या विकसनासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले.त्यांनी स्वप्न बांधनी केली.आपण स्वप्नभंग करू नये एवढी किमान जबाबदारी सर्व मराठी भाषिकांनी घ्यावी.आणि मराठी साहित्याला गतवैभव प्राप्त करून द्यावं अशी कळकळीची विनवणी करणं एवढंच आमच्या हाती आहे इति श्रीधर नांदेडकर हे वास्तव विवेचन वाचताना किती मौलिक विचार हित उपदेशक आहे असे वाटून जाते यातून संपादकाची नितळ निर्लेप निस्पृह भावना दिसून येते.नव्या पिढीची कविता खरोखरच यथोचित समकालीन अन् भाषा सौष्ठव.जुन्या पिढीतील कविता,हे संपादकीय प्रतिष्ठानाच्या वाचकांनी मनस्वीपणे वाचलं पाहिजे यातून साहित्य निर्मितीची नितळ श्रेध्दय भावना आणि निस्सीम काव्य भक्ती व प्रतिष्ठानाचा वाड्मयीन आविष्कार दिसून येतो.मे जून जुलै ऑगस्ट २५च्या अंक नियमित होतो.काळाचा अनुशेष भरून निघतो.आपले गुरुवर्य सुधीर रसाळ सरांचे संपादकीय कष्ठ तत्कालीन परिस्थिती ही बिकट वाट ही खडतर चं होती.आदरणीय गुरुवर्यांचे ऋण हे कायमचं आहे.त्यांचे श्रेय रसाळ सरांना ते देतात.तोच त्यांचा परिसस्पर्श श्रीधर नांदेडकर सरांनी उचलला आहे.पण 'प्रतिष्ठान'प्रतिष्ठा घेऊनचं यशस्वीतेची खंबीरपणे वाटचाल चालू आहे."एका बाजूला 'प्रतिष्ठान' ची उत्तमोत्तम निर्मिती आणि दुसऱ्या बाजूला अंक महत्त्वाचे वाचक, लेखक कवी पत्रकार, यांच्यापर्यंत पोहचवावा यासाठीची वितरणव्यवस्था सुधारणं या दोन्ही पातळ्यांवर आम्ही सातत्याने धडपडत आहोत.तुम्हा सर्वांचा पाठींबा आहे म्हणून हुरूप टिकून आहे.एका गोष्टीचा पुनरूच्चार करून थांबतो.'प्रतिष्ठान' 'सत्ता' नाही 'सेवा'आहे.प्रिय श्रीधरा मन गहिवरून गेले.आम्हा वाचकांचे अंतःकरण शुद्ध केले.ही सविनय ही सविनय सेवा.आत्मिक स्वानंद अत्यंत गहिरा करून जातो.या अंकाचे मुखपृष्ठ मराठवाडा भूमीचे अधिष्ठान प्राप्त करून देणारे आहे जसे'तथागत बुद्धांचे सम्यक दृष्टीचे चित्र,'तोडले ते झाडं राहिले ते खोडं,पक्षी सांत्वन करीतोया! खोल खोल मुळ्या भेगाळू आल्या,झाडाची सावली मातीत गाडली,पक्षी तो पाहुणी दु:खी झाला!.तशा या प्रतिष्ठान अंकाच्या वाड्मयीन मुळ्या खूप खोलवर रुजलेल्या आहेत.अनेक महान महंतांची अक्षर मांदियाळी प्रतिष्ठाने दिली आहे.जानेवारी ते एप्रिल याचे मुखपृष्ठ हे जागतिक वैभव पण मराठवाड्याचे 'अजिंठा' लेणी.या पुर्वी दौलताबादचा किल्ला हे मुखपृष्ठ किंवा लोगो ही प्रतिष्ठानची ओळख.अशी ही आशय संपन्न सृजन समर्पक मुखपृष्ठ.प्रतिष्ठानचे अंतरंग म्हणजे एक अभ्यासूवृत्तीचा अनुबंध आहे.प्रतिष्ठान अंकाला वाड्मयीन मूल्य कायम टिकून राह्यले आहे ते म्हणजे साक्षेपी संपादक दृष्टी.ते लिहितात,"आपली वाचन संस्कृती ढासळते आहे तिला थोपावता येईल? मानसोपचार तज्ज्ञ, अभ्यासक, समुपदेशक वारंवार सांगताहेत की, आरोग्य सांभाळायचं असेल तर 'मोबाईल'च्या जीवघेण्या विळख्यातून बाहेर पडा.'स्क्रीन टाईम' जाणीव पूर्वक कमी करा.'रिल्स'च्या चक्रातून स्वतःला सोडवा. सोशल मीडियाचाअतिरेकी वापर टाळा.आपल्या डोळ्यादेखत आपल्या मुलांचं जीवन उद्ध्वस्त होतंय.एकाकीपणा, चिडचिड, निराशा, आक्रमकता, हव्यास, असमाधान, आत्ममुग्धता, अहंकार, तुसडेपणा, नात्याविषयीची बेफिकीरी या गर्तेत अडकलेल्या नव्या पिढीतील (काही अपवाद वगळता) असंख्य मुलामुलींचं तनावग्रस्त आयुष्य आपण हताशपणे पाहत आहोत.(पृष्ठ ३)ही आजच्या समकालीन वास्तवाची जाणिव संपादकीय लेखनातून श्रीधर नांदेडकरांनी व्यक्त केली आहे.'प्रतिष्ठान'अंकाच्यासंपन्न समृद्ध सकारात्मक विचारधारेची भूमिकानिष्ठ अभिव्यक्ती, अंकाचे सामर्थ्य नोंदवते.प्रतिष्ठान हा अंक त्यातील संपादकीय विचारांची बांधिलकी ही वाचन संस्कृती जणू जोपासते आहे. त्यांच्यातील अभ्यासूवृत्तीचा संपादक हे मोठे लक्षणदिसून येते.इंग्लिश विषयीचे अध्यापक असल्याने त्यांचे वाचन हे अतिशय खोलवर आहे.प्रतिष्ठन हे मराठवाड्याचे मुखपत्र म्हणून खरोखरच अभिरुची संपन्नतेचा गौरवांकित वारसा पुढे घेऊन जाणारे एक सिद्धहस्त वाड्मयीन नियतकालिकात प्रथम दर्जाचे नक्कीच आहे.मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ कौतिकराव ठालेपाटील व कार्यवाह डॉ दादा गोरे यांनी प्रतिष्ठानाचे वाड्मयीन पुरस्कार.या उपक्रमाचे छबीदार मुखपृष्ठाचे व मलपृष्ठाचे आतिल पानावर दोन दोन फोटो यामुळे त्या पुरस्कार प्राप्त लेखकाकडे हा प्रतिष्ठानाचा अंक म्हणजे त्यांची गोड स्मृती असते.एक सक्षम भक्कम अनुभवाचे प्रखर बोल म्हणजे वास्तवाची तळपती तलवार आहे.यात कौतिकराव ठालेपाटील यांचे अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या मांडवा खालून "खाचा आणि खळगे"आजतागायतचा अतिशय प्रखर वास्तववादी इतिहास सत्यनिष्ठतेचे बाजू घेऊन सृजन वाचकांच्या मनाचा ठाव घेते.खरचं हे साहित्य संमेलनाचा नैतिक अनैतिक साहित्यिक इतिहास किती गढूळ होता! असेहीनाही सकारात्मक गोष्टींचा ही उवापोह केला आहे.मसाप कार्यवाह डॉ दादा गोरे सरांचा'जंगल महर्षी मारोती चितमपल्ली याचे स्मरण' या लेखात साक्षात पत्र स्नेह उलगडला आहे.प्रतिष्ठान वाचक साहित्यिकांची एक दृष्टी सजग करते.मग यात 'भारतीय कविता (बंगाली) अमिताभ गुप्ता,'विश्व कविता.कथा, कांदबरी अंश, ललित, समीक्षेचा दृष्टीकोन वाचकांला लेखकाला एक दिशा देऊन जातो.जसे'मार्क्सवाद आणि मराठी कथा' परिक्षणे, लेखकाची आवड,वाचकांची आवड,तर हे जून जुलै ऑगस्ट च्या अंकात 'उगवाई' म्हणजे नव्याक्रींग पोरांच्या कविता.स्वप्नील चव्हाण,सागर चव्हाण,'थोरली पाती.ही खरोखरच महत्त्वाचे कवी जन्तरपाती म्हणजे विलास वैद्य, अनिकेत कुलकर्णी यांच्या कविता.भाषा भगिनी यात भारतीय भाषांतील कविता अनुवाद.कांदबरी अंश.नेहमीची लोकप्रिये सदरे.एकूण वाचक लेखकांच्या हातात प्रतिष्ठान अंक पडला की, संपादकीय वाचल्यावर एक सृजनशील साक्षात हळवा कवी मोठ्या संवेदनशीलतेने व्यक्त होतो.'सत्ता'नाही सेवा आहे.तुमचा पाठींबा हाच आमचा 'हुरूप'..कवी स्नेही प्रतिष्ठानचे साक्षेपी कार्यकारी संपादक श्रीधर नांदेडकर, उपसंपादक समिता जाधव, संपादक मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन आपल्या सृजनशील स्नेहाळू भावनेचा आदर.कार्यवाह डॉ दादा गोविंदराव गोरे सरांचे मनस्वी आभार.

**डॉ प्रभाकर शेळके,**
**जालना**
**मो.** 99751 37337

जाहिरात दर
१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-